Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# संगीत मराठी रंगभूमीवरील अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या दिग्दर्शिकीय दृष्टिकोनाचा अभ्यास

**माया भगवान बोर्डे**
संशोधक विद्यार्थीनी (Ph.D)
नाट्यशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद

**डॉ.अशोक गुराप्पा बंडगर**
संशोधक मार्गदर्शक
नाट्यशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद

**प्रस्तावना:-**

संगीत मराठी रंगभूमीचे जनक अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्म गुर्लहोसून गावी झाला असला तरी त्यांचे शिक्षण मात्र कोल्हापुर, धारवाड व पुणे अशा ठिकाणी झाले आहे. अण्णासाहेब किर्लोस्कर यांना मराठी हिंदी, कानडी, संस्कृत भाषा अवगत होत्या, विष्णुदास भावे यांनी ज्या वर्षी पौराणिक मराठी रंगभुमीची मुहुर्त मेढ रोवली त्याच वर्षी किर्लोस्कराचा जन्म झाला म्हणून 1843 हे वर्ष मराठी रंगभूमीसाठी भाग्याचे मानल्या जाते.

विष्णुदास भावे यांच्या कर्तृत्वाचा ठसा अण्णासाहेबांच्या मनावर उमटला असणार, अण्णासाहेब यांचा नाटक करण्याचा दिग्दर्शिकीय दृष्टिकोन अतिशय वेगळा आहे. "1873 साली किर्लोस्करांनी शांकर दिग्विजय हे नाट्यख्यान लिहिले" (डॉ.रुस्तुम अचलखांब "मराठी रंगभुमीचे प्रारंभ पर्व" वर्षा प्रकाशन ,औरंगाबाद ) वरील संदर्भातून स्पष्ट होते की अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे नाटक नसून आख्यान आहे. हे नाटक मराठी रंगभूमीवर अवतरले त्या वेळी 'बुकीश' नाटकाच्या उत्क्रांतीचा टप्पा होता. "दि.2 जानेवारी 1875 रोजी बेळगांव येथे सादर करण्यात आलेल्या शांकर दिग्विजय या नाट्यख्यानाने किर्लोस्कर स्वत: प्रभावित झाले व त्यांच्यात नव्या निर्मितीची उमेद निर्माण झाली यावेळी त्यांनी नाट्यव्यवसायात स्वत:ला झोकुन देण्याचे ठरविले" (डॉ रुस्तुम अचलखांब "मराठी रंगभुमीचे प्रारंभ पर्व "वर्षा प्रकाशन, औरंगाबाद) वरील संदर्भातून रंगभूमीकडे किर्लोस्करांचा कल कसा जातो, ते नाटकाकडे कसे वळतात हे लक्षात येते.

पौराणिक मराठी रंगभूमी विसंगतीने ग्रस्त झाली असावी विष्णुदास भावे च्या हयातमध्येच उदयाला आलेली इचलकरंजीकर नाटक मंडळी तेवढी समर्थपणे उभी राहिलेली होती त्या काळामध्ये बुकीश नाटके सादर करण्याचा प्रघात सुरु होता बऱ्याच नाटक कंपन्यांनी आपले चंबुगबाळे गुंडाळून परप्रांतातून भ्रमण सुरु केले असल्याने अशा विचित्र परिस्थितीमध्ये मराठी रंगभुमीचा नवा आशय आणि नवे रुप देणाऱ्यांची गरज भासू लागली

अण्णासाहेब यांच्या रुपाने मराठी रंगभुमीला नवी दिशा देणारा जाणकर कलावंत मिळाला, त्यांनी शांकुतल, सौभद्र आणि रामराज्य वियोग ही नाटके लिहिली ". (डॉ.रुस्तुम अचलखांब 'मराठी रंगभुमीचे प्रारंभ पर्व', वर्षा प्रकाशन औरंगाबाद)

असे म्हटल्या जाते की रामराज्य वियोग हे नाटक अर्धवट राहिले नाटक सादर करण्यासाठी त्यांनी किर्लोस्कर संगीत नाटक मंडळी ची स्थापना केली असुन संगीत रंगभुमीचे नवे पर्व सुरु केले.

ते शिक्षित होते, कवी होते, संगीज्ञ होते त्यांना लोकरंगभुमीची आवड होती, त्याच्या या चौफेर व्यक्ती महत्वामुळेच मराठी रंगभूमीला नवी दिशा देण्याचे कार्य ते करु शकले असे म्हणता येईल.

त्यांनी नाटकामध्ये काय काय बदल केले? संगीताचा उपयोग नाटकामध्ये कसा केला? नाटकाला कसे स्वरुप दिले? एक दिग्दर्शक म्हणून नाटक सादर करताना त्यांचा दिग्दर्शिकीय दृष्टिकोन किती महत्वाचा आहे याचा अभ्यास महत्वपूर्ण आहे.

- **संगीत रंगभूमीचे जनक अण्णाहेब किर्लोस्कर यांचा दिग्दर्शिकीय दृष्टिकोन:**

किर्लोस्कर आद्य संगीत मराठी नाटककार होते, त्याची नाटके अतिशय वेगळी होती विष्णुदास भावे नाट्य प्रयोग उर्दु-पारशी-गुजराती रंगभुमी वरील प्रयोग,संस्कृत,इंग्रजी नाटकाचे संकलन फार्स च्या परिपाश्र्व मध्येच बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा काळ सुरु झाला. "विष्णुदासी पौराणिक नाटकात गीत गाणारा सुत्रधार वेगळा वादक वेगळे आणि प्रत्यक्ष भुमीका करणारा नट निराळा अशी अवस्था होती किर्लोस्करांनी गायन आणि अभिनय एकत्र करुन ही विसंगती दुर केली" (डॉ.रुस्तुम अचलखांब, मराठी रंगभुमीचे प्रारंभपर्व, वर्षा प्रकाशन औरंगाबाद)

विष्णुदास भावे जी नाटके करायची त्यांची सादरीकरण वेगळे होते आणि अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी नाटकामध्ये एकसुत्रता आणून त्याचा दिग्दर्शिकीय दृष्टिकोन वेगळा कसा आहे हे स्पष्ट केले आहे. या प्रभावातूनच त्यांनी नाटक सुरू केले असावे अण्णांच्या आधी असे प्रयत्न काही प्रमाणात मराठी रंगभूमीवर झाले आहेत.

परंतु अण्णासाहेब यांनी जी गती आणि दिशा मराठी संगीत नाटकाला दिली ती मात्र क्रांतीकारक ठरली, मराठी मनावर पक्का ठसा उमटला तो संगीत मराठी नाटका मुळेच, संगीत नाटक लिहिण्याची प्रेरणा इंग्रजी ऑपेरा पाहून झाली असा त्यांच्या चरित्रकरांनी उल्लेख केला आहे. "इंग्रजी ऑपेरा पेक्षा किर्लोस्करांचा संगीत नाटकाचे स्वरुप वेगळे आहे, त्यांची नाटके केवळ पद्यत्मक, नसून गद्यपद्यात्मक आहे" (प्रा.मधुकर नारायणराव लोही ' मराठी नाटक आणि रंगभूमी: एक अभ्यास ' लाखे प्रकाशन नागपुर) म्हणजेच काय तर कोणत्याही कलाकृतीची सुरुवात ही प्रभावातून होत असते असे म्हणता येईल.

"नाटक के प्रास्ताविक में अण्णासाहेब के अंग्रेज शैली में रसनिर्माण का मनोदय अभिव्यक्त किया है। इससे यह स्पष्ट है कि संस्कृत नाटकों कि तरह उनकी नजर में आंग्लदेशीय व्हिक्टोरियन रंगमंच के नाटक भी थे संभव है इन दोनों के सम्मिलित मंचनतंत्र के आधार पर उन्होने अपने नाटकोका –खासकर शाकुंतल, सौभद्र का लेखन एवं मंचन किया होगा" (संपादक :डॉ. वि. भा. देशपांडे "मराठी नाट्यकोश (खंड -1)" अमेय इन्स्पायरिंग बुक्स)

वरील संदर्भातून स्पष्ट होते की, वेगवेगळी नाटके बघून नविन असे काय करता येऊ शकते, या दृष्टिकोनातून रंगभूमीवर संगीत नाटक करण्यात आले आहे भाव्याच्या पौराणिक नाटकातला तोचतो पणा प्रेक्षकांना नकोसा झाला असून अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी प्रयोगभर स्टेजवर उभा राहणार सुत्रधार काढून टाकला व विदुषकालाही बाद केले आणि पौराणिक कथानक त्यांनी कायम ठेवले परंतू त्यातील देव, राक्षस, ऋषी,इ. पात्राचे उच्चाटन केले असे असू शकते.

शांकुतल किंवा सौभद्र ही नाटके लिहिल्याबद्दल विष्णुशास्त्री चिपळुनकरांनी किर्लोस्करांचे आभार मानले आहेत. "केसरीच्या अंकामध्ये 'शाकुतल' नाटकासंबंधी लिहिताना त्यांनी ओपेरा म्हणूनच या नाटकाचा विचार केलेला आहे. ही एक नवी टूम आमच्यात सुरु झाली याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. या नाटकातील गायन प्रकार त्यासाठी निवडलेले गवय्ये गाण्यांना लावलेल्या चाली आणि भुमिका घेणाऱ्या पात्रांची यथायोग्य निवडणूक ही किर्लोस्कराची वैशिष्ट्ये चिपंळूणकरानी नेमकी हेरलेली आहेत" (डॉ.चंद्रकांत धाडे 'मराठी नाट्यसमीक्षा', किर्ती प्रकाशन औरंगाबाद) किर्लोस्कर यांची नाटक करतानाची वैशिष्टये ही वरील संदर्भातून स्पष्ट होते.

अण्णासाहेब हे रंगकर्मी होते त्यांनी निर्माण केलेल्या संगीत मराठी रंगभूमीचे स्वागत समाजातल्या सगळ्या थरातून झाले त्यांच्या रंगभूमीला 'स्वतंत्र' किर्लोस्करी संगीत नाटक म्हणून मान्यता दिली असे म्हणता येऊ शकते. "शाकुंतल हे कालिदासच्या अभिज्ञान शांकुतल वर आधारीत जरी असले तरी त्यांचे संगीत स्वतंत्र आहे. यातील पद्य रचनांना साहित्याचे अंग जरी असले तरी ही पद्ये गीताच्याच अंगाने अधिक जातात या नाटकाची रचना संस्कृत नाटकाची रचना संस्कृत नाटकासारखी झाली आहे. त्यात नांदी,प्रस्तावना प्रवेशक, भरतताक्य हे सगळे घटक जरी आले असले तरी त्यातील संगीतामुळे त्याने आपले निराळेपण सिध्द केले आहे" (डॉ.रुस्तुम अचलखांब "मराठी रंगभुमीचे प्रारंभ पर्व" वर्षा प्रकाशन ,औरंगाबाद.)

याचाच अर्थ असा की संस्कृत नाटकाप्रमाणे रचना झाली असली तरी देखील संगीत हा भाग अण्णासाहेबाचा नाटकामधील महत्वपुर्ण होता. अण्णासाहेब यांचा शांकुतल आणि सौभद्र च्या रुपाने त्यांचा हा घाट पुढे आदर्श मानला गेला असावा आणि संगीत मराठी नाटकांची परंपरा सुरु झाली असून या परंपारेमुळे आधीचे विष्णुदासी पौराणीक नाटक मागे पडले. "संगीत हे सौभद्र चे अविभाज्य अंग आहे या नाटकाला अनेकानी ओपेरा असे संबोधले असले तरी ते ओपेरा नसून अण्णांच्या स्वतंत्र कल्पनेचा विलक्षण खेळ आहे." (डॉ.रुस्तुम अचलखांब "मराठी रंगभुमीचे प्रारंभ पर्व" वर्षा प्रकाशन , औरंगाबाद.)

म्हणजे काय तर अण्णाचे नाटक हे ओपेरा नाही स्वतंत्र नाटक असून ओपेरा हा पद्यमय प्रकार असून 'सौभद्र' नाटके हे गद्य-पद्य आहे, त्यातील पद्य जेवढे महत्वपुर्ण आहे त्यातील गद्य ही महत्वाचे आहे. म्हणून किर्लोस्कराचे नाटक ऑपेरा नाही तर त्या प्रभावाने निर्माण झालेले काही अंश घेऊन केलेले गद्य-पद्य आहे. "संगीत शांकुतल नाटकातील पदापेक्षा सौभद्र मधील पदे अधिक अनुकूल आणि प्रसंगानुरूप असावीत, किर्लोस्करांच्या संगीत शांकुतलात 198 पदे आहेत सौभद्रांत ही संख्या 92 झाली. (डॉ. चंद्रकांत धाडे 'नाट्यमंथन', किर्ती प्रकाशन औरंगाबाद )

त्यांच्या नाटकातील पदाची संख्या वरील संदर्भात सांगण्यात आली आहे.त्यांच्या नाट्य संगीतातून भावाभिव्यक्ती व स्वभाव दर्शनही साधलेले आढळते त्यांची पद रचना ही अर्थपुर्ण असून ती ज्या चालीवर केली आहे, त्या चाली हेतूगर्भ असू शकतात.

"अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी संगीत सौभद्र द्वारेसिध्द केलेली श्री कृष्णाची व्यक्तीरेखा अधिक उठावदार बनली आहे. श्रीकृष्ण ही व्यक्तीरेखा सुभद्रा, द्रोपदी, बलराम आणि अर्जुन या प्रत्यकाशी जणू लपंडाव खेळत खेळत कथानक पुढे सरकावते आणि श्रीकृष्णाच्या या कारस्थानाचा भाग होऊन जाते " (श्री ढोबळे विनोद सुर्यभान –शोधप्रबंध, तमाशा लोकरंगभूमीची प्रायोगिक

मुल्ये आणि बदलते स्वरुप 2016 वर्ष औरंगाबाद, डॉ.बाबासहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद)

सौभद्रच्या कथानकात कोणती पात्र महत्वपुर्ण आहे कथा कशी पुढे जाते. याबाबत वरील विवेचनात स्पष्ट केले आहे किर्लोस्करांनी घडून आणलेले नाट्य सांगीतातील मन्वंतर पुर्व परंपरेला सोडून नव्हते या संबंधात नाट्य संगीताचे अभ्यासक श्री.बापुराव जोशी म्हणतात. “त्यांनी किर्तनातील वृत्ते घेतली व देवाधिकांचे पदे घातली. पण त्याला हरदासी स्वरुप येणार नाही याची खबरदारी घेतली लावणी ढंग वापरला पण तमाशाचे हलके स्वरुप येऊ दिले नाही. गवय्यी गाणे घेतले पण नाट्य संगीतास जलसाचे स्वरुप येऊ दिले नाही ” (प्रा. मधुकर नारायणराव लोही “मराठी नाटक आणि रंगभूमी एक अभ्यास” लाखे प्रकाशन औरंगाबाद)

किर्लोस्करांच्या केलेचे कौतुक करावे तेवढे थोडे असून त्यांनी कथा सुत्रांशी निगडीत व नाट्यनुकूल अशी व पद्य रचना व त्या पदानां अर्थ मिळेल व नाट्यरसाचा परिपोष होईल. अशा तऱ्हेच्या त्यांना चाली देणेही तर किर्लोस्करांची नाट्य सांगीताचा मोठी अविस्मरणीय देणगी आहे. असे म्हणता येईल. त्यांनी लोकप्रीय श्रृंगार रसप्रधान कथानकाची निवड असून प्रायोगीक दृष्टीने योग्य व कलात्मक असे फेरफार त्यांनी केले असावे. त्यांच्या नाटकाची वैश्ष्टिये सांगायची झाल्यास त्यांनी “नाटकातील संगीत बसवताना लाकोपयोग किर्तन परंपरेतील किंवा प्रचलित असलेल्या साध्या रसा पोषक चाली , साकी, दिंडी, जातीवृत्ते, लावणी बाजाच्या चाली स्वीकारल्या कर्नाटकी चालीशी त्यांनी एकरुप करुन त्यांचा मेळ घातला ”( श्री ढोबळे विनोद सुर्यभान –शोधप्रबंध, तमाशा लोकरंगभूमीची प्रायोगिक मुल्ये आणि बदलते स्वरुप 2016 वर्ष औरंगाबाद, डॉ.बाबासहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद )

यावरून त्यांचा दिग्दर्शकीय दृष्टीकोन किती वेगळा आहे हे दिसून येते. त्यांनी सुत्रधारकडील गायनाचा मक्ता काढून घेवून सर्व पात्रांना सांगिताची विभागणी केली म्हणजेच नाटकात सुत्रधाराकाडील पदे म्हणण्याची धाटनी बदलून टाकली व पात्राच्या मुखी पदे दिले म्हणजेच पात्रांच्या अनुकूल संगीत रचना त्यांनी केली असावी. योग्य संगीत दिल्यामुळे नटांना अनुकूल असे प्रभावी रस परिपोष होण्यास मदत मिळत असावी. “किर्लोस्करांनी जुनी हरिदासी पध्दत शास्त्रीय हिंदूस्थानी संगीत आणि कर्नाटक संगीत यांचा समन्वय घडून आणला.” (प्रा. मधुकर नारायणराव लोही ‘मराठी नाटक आणि रंगभूमी एक अभ्यास’,लाखे प्रकाशन औरंगाबाद)

म्हणजेच वेगवेगळ्या संगीताचा उपयोग त्यांनी त्यांच्या नाटकासाठी करुन पौराणिक कथांना नवा बाज घाट देण्याचा प्रयत्न केला असावा, त्यांनी नाटकातील गद्य, पद्य एकजीव व एकसंघ बनून टाकले असे म्हणता येईल अण्णासाहेब किर्लोस्करांसारखा नाटककाराचे प्रयत्न मात्र जास्त डोळस होते. कारण त्यांनी संगीत आणि त्यांची संबंध अशी रंगभूमीची कला यात नाविण्य, आकर्षकता आणतात. त्यांनी नाट्यलेखन व संहितेकडेही लक्ष दिले. किर्लोस्करांनी आपल्या काळी अस्तित्वात असलेल्या रंगभूमीच्या निरनिराळ्या प्रकारामधून घेण्याजोगा अंश निवडून आपली संगीत नाट्यीरुपी कलाकृती तयार केली आहे. अण्णाचे नाट्यसंगीत केवळ स्वयंसगीत नाही तर ते शब्दातील अर्थ भाव गर्भ आणि नाट्य गर्भ अर्थ घेऊन जन्माला आलेले असून ते अधिक उत्कंठ आणि या साध्य ही बनले असावे त्यांच्या नाटकातील पदे नाट्यगर्भ असून ते संगितानूकूल

असावीत. अण्णासाहेब किर्लोस्करांनी संगीत मराठी रंगभूमीची परंपरा सुरु करुन मराठी रंगभूमीवर नवे पर्व सुरु केले त्यांची ही रंगभूमी अल्पावधीतच लोकप्रिय झाली या रंगभूमीने मराठी मानसाचे खूप मनोरंजन केले असावे. संगीत मराठी नाटकाचा ठसा मराठी मनावर पक्का उमटला तो अण्णांच्या नाटकामुळेच म्हणूनच ते मराठी संगीत नाटकाचे प्रर्वतक म्हणून ओळखले जातात.

**निष्कर्ष :-**

किर्लोस्करांच्या नाटकात गाणी जास्त असली तरी गद्य संवादही तितकेच आहे त्यामुळे त्यांच्या दिग्दर्शकीय दृष्टीकोन हा वेगळा आहे. नाटकाची शैली गद्य-पद्यत्मक आहे सुत्रधाराची नाटकाची शैली गद्य-पद्यत्मक आहे. सुत्रधाराला गाण्यासाठी पदे न देता पात्राच्यामुखी पदे देऊन पात्राच्या अनुसरून किर्लोस्कर यांनी संगीत रचना करुन मराठी रंगभूमीचा पाया रोवला आहे.

संस्कृत नाटकासाखी रचना जरी शांकूतल आणि सौभद्र नाटकाची होती तरी देखील संगीत हे त्यांच्या नाटकाचे निराळेपण सिध्द करते. किर्लोस्कर यांनी वेगवेगळया शैली जसे हरिदासी पध्दत, शास्त्रीय हिंदूस्थानी संगीत, कर्नाटक संगीत, यांचा समन्वय घडून आणला आहे. किर्लोस्करांच्या नाटकातील संगीत हे कथानकांचा अविभाज्य भाग होता यावरुन त्यांचा दिग्दर्शिकीय दृष्टीकोन किती वेगळा होता हे दिसून येते.

**संदर्भ :-**

1) डॉ. रुस्तुम अचलखांब "मराठी रंगभुमीचे प्रारंभ पर्व " वर्षा प्रकाशन औरंगाबाद
2) प्रा. मधुकर नारायणराव लोही
"मराठी नाटक आणि रंगभूमी :एक अभ्यास" लाखे प्रकाशन औरंगाबाद
3) डॉ. चंद्रकांत धाडे "मराठी नाट्यसमीक्षा" किर्ती प्रकाशन,औरंगाबाद
4) डॉ. चंद्रकांत धाडे "नाट्यमंथन" किर्ती प्रकाशन औरंगाबाद
5) डॉ. वि.भा देशपांडे "मराठी नाट्यकोश"(खंड -१) अमेय इन्सापयरिंग बुक्स, पुणे
6) श्री ढोबळे विनोद सुर्यभान –शोधप्रबंध - तमाशा लोकरंगभूमीची प्रायोगिक मुल्ये आणि बदलते स्वरुप 2016 वर्ष औरंगाबाद, डॉ.बाबासहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद